# Gramin Krishi Mausam Sewa

Experimental Block Level Agromet Advisory Bulletin
(A Joint Initiative of IMD & ICAR )

## Agromet Advisory Bulletin

**Date : 05-03-2021**

**Weather Forecast of KALMESHWAR Block in NAGPUR(Maharashtra) Issued On :2021-03-05(Valid Till 08:30 IST of the next 5 days)**

| Date (y-m-d) | Rainfall (mm) | Tmax (°C) | Tmin (°C) | RH I (%) | RH II (%) | Wind Speed (kmph) | Wind Direction (Degree) | cloud cover (Octa) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2021-03-06 | 0.0 | 37.6 | 17.2 | 15 | 7 | 13.0 | 330 | 0 |
| 2021-03-07 | 0.0 | 36.7 | 17.9 | 13 | 8 | 8.0 | 23 | 0 |
| 2021-03-08 | 0.0 | 37.5 | 19.3 | 13 | 6 | 7.0 | 153 | 0 |
| 2021-03-09 | 0.0 | 37.0 | 19.3 | 18 | 8 | 9.0 | 161 | 0 |
| 2021-03-10 | 0.0 | 38.3 | 21.4 | 19 | 9 | 5.0 | 162 | 1 |

### Weather Summary/Alert:

In Kalameshwar block, as per forecast given by, RMC, Nagpur, during next five days sky will be clear and weather will be dry is forecasted.

कळमेश्वर तालुक्यामध्ये, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या अंदाजानुसार, पुढील पाच दिवस आकाश निरभ्र तसेच हवामान कोरडे राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

### General Advisory:

By Considering increasing temperature, provide green fodder, cold and clean water and shelter should be provided in the shade, as well as depend upon availability of soil moisture and crop water need irrigate the leafy vegetables, okra, guar, chawli, cucumber, Bottle Gourd, pumpkin, ridge gourd, bitter gourd, round gourd, watermelon, muskmelon, spinach, radish, fenugreek and coriander. Mature gram, wheat, linseed, jowar, maize, safflower, arhar and other crops should be harvested and threshed im

तापमानात होणारी संभाव्य वाढ लक्षात घेता, जनावरांना हिरवा चारा, पिण्यास थंड व स्वच्छ पाणी द्यावे तसेच सावलीच्या ठिकाणी निवाऱ्याची व्यवस्था करावी, त्याचबरोबर पालेभाज्या, भेंडी, गवार, चवळी, काकडी, दुधी भोपळा, काशीफळ, दोडका, कारली, ढेमसे, टरबूज, खरबूज, पालक, मुळा, मेथी आणि कोथिंबीर पिकास जमिनीतील ओलावा बघून आवश्यकतेनुसार ओलीत करावे.परिपक्व झालेल्या हरभरा, जवस, गहू, ज्वारी, मका, करडई, तूर आणि इतर पिकाची तात्काळ काढणी व मळणीची कामे करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी.

### SMS Advisory:

Spray 2, 4-D/ 1.5gm and potassium nitrate 1kg in 100 liters water if there is sudden rise in temperature between 35 to 40 degree Celsius.

तापमानातील वाढ (३५ ते ४० अंश सेल्सियस) लक्षात घेता २-४ डी १.५ ग्राम आणि पोटाशियम नायट्रेट १ किलो १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

### Crop Specific Advisory:

| Crop(Varieties) | Crop Specific Advisory |
|---|---|
| CHICK PEA | Chickpea Harvesting & Threshing: Harvesting and threshing should be matured chickpea crop and stored in a safe place.<br>हरभरा काढणी व मळणी: परिपक्व झालेल्या हरभरा पिकाची तात्काळ काढणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| MAIZE | Keep the crop weed free by giving 2 to 3 times hoeing till the crop is 40 days old.<br>पिक ४० दिवसाचे होईपर्यंत २ ते ३ वेळा डवरणी व निंदन करून पिक तणविरहित ठेवावे. |
| GROUNDNUT | Groundnut WeedManagement: If weed management should be done with herbicide, spraying should be done at 25 to 30 days after sowing after germination with Quizalofop Ethyl 5 % EC 100 gm active ingredient or Imazethapyr 10% SL 100 |

| Crop(Varieties) | Crop Specific Advisory |
|---|---|
| | gm active ingredient mixed in 600 liters of water per hectare.After complete germination, apply water stress till theflowering stage. |
| | भुईमुग तण व्यवस्थापन: तणनाशकाच्या सहाय्याने तण व्यवस्थापन करावयाचे असल्यास उगवण पश्चात पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी क्विझालोफॉप इथाईल ५ ईसी १०० ग्राम क्रियाशील घटक किंवा इमाझीथायपर १० % एसएल १०० ग्राम क्रियाशील घटक या पैकी कोणत्याही एका तणनाशकाची प्रती हेक्टर ६०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. संपूर्ण उगवण झाल्यानंतर पिक फुलावर येईपर्यंत पाण्याचा ताण द्यावा. |
| GROUNDNUT | For control thrips, when ETL cross (5 thrips per three leaves), then spraying should be taken of Quinalphos 25 % EC (28 ml/10 liter of water) 1400 ml/hectare in 500 litre of water. |
| | भुईमुगफुलकिडे व्यवस्थापन: फूलकिड्यांच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी आर्थिक नुकसानीची संकेत पातळी ५ फुलकिडे प्रति शेंडा गाठल्यावर क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही १४०० मिली प्रति हेक्टरी ५०० लिटर (२८ मी.ली./१० लिटर पाणी) पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| WHEAT | Wheat Irrigation Management: According to soil moisture status and crop needs, wheat crop should be irrigated at milking stage (80 to 85 days after sowing) and grain filling stage (90 to 105 days after sowing). Wheat sown on time should be harvested after maturity and care should be taken not to break the seeds during threshing. |
| | गहू पाणी व्यवस्थापन: गहू पिकास जमिनीतील ओलावा व पिकाची गरज लक्षात घेता पिक अवस्थेनुसार दाण्याची दुधाळ अवस्था (पेरणीनंतर ८० ते ८५ दिवस), दाण्यात चिकाची अवस्था (९५ ते १००) मध्ये असताना सिंचन करावे. वेळेवर पेरणी केलेल्या गहू पिकाची परिपक्व झाल्यानंतर कापणी करावी तसेच मळणी यंत्राने मळणी करताना दाणे फुटणार नाही याची काळजी करावी. |
| MUSTARD | MustardHarvesting & Threshing: Carry out harvesting, threshing and safe storage of matured mustard crop. |
| | मोहरी काढणी व मळणी: परिपक्व झालेल्या मोहरी पिकाची काढणीवमळणी ची कामे करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| SESAME (GINGELLY/TIL) | Sesame Interculture Operation Management: Summer sesame crop should be thinned first 15 to 20 days after sowing and second after 8 days at a distance of 10 to 15 cm between the two seedlings. Since early growth of sesame crop is slow, crop field should be kept weed free till one month of crop age. Keep the field clean by making 2 to 3 hoeing / hand weeding as per the requirement of the crop.Sesame crop should be irrigated at intervals of 12 to 15 days as per soil moisture condition and care should be taken not to retain water in the crop while irrigating. |
| | तीळ आंतरमशागत व पाणी व्यवस्थापन: उन्हाळी तीळ पिकास पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी पहिली व त्या नंतर ८ दिवसांनी दुसरी विरळणी करून दोन रोपांत १० ते १५ सेंटीमीटर अंतर ठेवावे. तीळ पिकाची सुरुवातीची वाढ हळू असल्यामुळे पिक एक महिन्याचे होईपर्यंत तण विरहित ठेवावे. पिकास आवश्यकतेनुसार २ ते ३ कोळपण्या/ खुरपण्या करून शेत स्वच्छ ठेवावे. जमिनीच्या मगदुराप्रमाणे तीळ पिकास १२ ते १५ दिवसाच्या अंतराने ओलीत करावे तसेच ओलीत करतांना पिकात पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| TOMATO | Tomato Pest Management: For management of thrips and white fly on tomato crop, spraying should be taken of Thiamethoxam 25 % WG 4 gm or Dimethoate 30% EC in 10 ml per 10 liters of water. For management of tomato fruit borer spraying should be taken quinalphos 25 EC 20 ml in 10 litre of water. |
| | टोमाटो कीड व्यवस्थापन: फुलकिडे आणि पांढऱ्या माशीच्या व्यवस्थापनासाठी थायमेथोक्झाम २५ टक्के विद्याव्य दाणेदार ४ ग्राम किंवा डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फळ पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| OKRA/ LADIES' FINGER | For management of sucking pest observed in okra, spray Thiamethoxam 25 % WG 2 gm Or Imidacloprid 17.8 SL, 2 ml in 10 liter of water. |
| | भेंडी पिकावर, मावा, तुडतुडे, फुलकिडे या रसशोषक किडीचा प्रादुर्भाव आढळल्यास नियंत्रणाकरिता थायामिथोक्साम २५ टक्के विद्राव्य दाणेदार २ ग्राम किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के प्रवाही १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

**Horticulture Specific Advisory:**

| Horticulture(Varieties) | Horticulture Specific Advisory |
|---|---|

| Horticulture(Varieties) | Horticulture Specific Advisory |
|---|---|
| LINSEED | Linseed Harvesting &Threshing: Harvesting should be carried out as soon as the pods begin to turn yellow colour & seed becomes hard. Use sickle to cut the crop close to the ground. After harvesting, dry the harvested produce for 4 to 5 days and carry out threshing and store the seed produced in safer places. |
| | जवस काढणी व मळणी:जवस पिकाची पाने व बोन्डे पिवळे पडल्यावर पीक काढणीस योग्य समजावे. जवस पिकाची कापणी विळ्याच्या साहाय्याने करावी. कापणी झाल्यावर ४-५ दिवस वाळवून मळणी करावी व बी योग्य ठिकाणी साठवून ठेवावे. |
| WATER MELON | WatermelonIrrigation Management: Irrigate the Watermelon crop at an interval of 6 to 8 days. According to soil moisture and crop need irrigation interval should be decrease or increase. Interculture operation and 2nd split dose of Nitrogen Management: Apply 40 kg Nitrogen 30 days after planting. Weeding should be done 2-3 times to keep the crop clean and healthy. |
| | टरबूज पाणी व्यवस्थापन: लागवड झालेल्या टरबूज पिकास ६ ते ८ दिवसांनी पाणी द्यावे. जमिनीचा मगदूर व पिकाची गरज या नुसार दोन पाणी पाळ्यातील अंतर कमी जास्त करावे. आंतरमशागत व नत्राचा दुसरा हप्ता व्यवस्थापन: लागवड झाल्यानंतर ३० दिवसांनी नत्राचा दुसरा हप्ता ४० किलो नत्र द्यावे. पिक स्वच्छ व निरोगी राहण्यासाठी २ ते ३ वेळा निंदनी करावी. |
| MUSKMELON | MuskmelonIrrigation Management: Irrigate the Muskmeloncrop at an interval of 6 to 8 days. According to soil moisture and crop need irrigation interval should be decrease or increase. Interculture operation and 2nd split dose of Nitrogen Management: Apply 40 kg Nitrogen 30 days after planting. Weeding should be done 2-3 times to keep the crop clean and healthy. |
| | खरबूजपाणी व्यवस्थापन: लागवड झालेल्या खरबूज पिकास ६ ते ८ दिवसांनी पाणी द्यावे. जमिनीचा मगदूर व पिकाची गरज या नुसार दोन पाणी पाळ्यातील अंतर कमी जास्त करावे. आंतरमशागत व नत्राचा दुसरा हप्ता व्यवस्थापन: लागवड झाल्यानंतर ३० दिवसांनी नत्राचा दुसरा हप्ता ४० किलो नत्र द्यावे. पिक स्वच्छ व निरोगी राहण्यासाठी २ ते ३ वेळा निंदनी करावी. |
| ORANGE | Orange Fruit Dropping Management: Foliar application of gibberellic acid 1.5 gm + urea 1 kg may be given to Ambia bahar during fruit set after mixing it in 100 litres water. (Dissolve gibberellic acid in 10 ml alcohol before mixing in water).Spray 2, 4-D/ 1.5gm and potassium nitrate 1kg in 100 liters water if there is sudden rise in temperature between 35 to 40 degree Celsius. |
| | संत्रा फळ गळ व्यवस्थापन: आंबिया बहाराच्या फळ गळ व्यवस्थापनासाठी जिब्रेलिक आम्ल १.५ ग्राम आणि युरिया १ किलो १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. यामुळे आंबिया बहार चांगला येण्यास मदत होते. (जिब्रेलिक आम्ल पाण्यात मिसळण्या पूर्वी १० मिली अल्कोहोल मध्ये मिसळावे). तापमानातील वाढ (३५ ते ४० अंश सेल्सियस) लक्षात घेता २-४ डी १.५ ग्राम आणि पोटाशियम नायट्रेट १ किलो १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| ORANGE | Orange Irrigation Management: Continue drip irrigation at the rate of 12-53, 78-127 and 145-180 litres per day for 1-4, 5-7, 8 years and above trees old respectively. Follow irrigation with double ring method or square method irrigate orchard at 7 to 10 days interval. Considering the increasing temperature, mulching around tree trunk up to 5-10 cm should be done with wheat straw, paddy straw or uprooted weeds so that, evaporation of water due to high temperature can be minimized which helps in reducing fruit crop. |
| | संत्रा पाणी व्यवस्थापन: तापमानातील संभाव्य वाढ लक्षात घेता फळबागेस जमिनीच्या प्रकारानुसार ७ ते १० दिवसाच्या अंतराने दुहेरी आळे पद्धतीने किंवा चौकोनी आळे पद्धतीने पाणी द्यावे. ठिबक सिंचन संच उपलब्ध असल्यास १ ते ४ वर्ष वयाच्या झाडाला १२ ते ५३ लिटर पाणी, ५ ते ७ वर्ष वयाच्या झाडाला ७८ ते १२७ लिटर पाणी व ८ वर्षावरील झाडांना १४५ ते १८० लिटर प्रती झाड प्रती दिवस पाणी द्यावे.शेतातील गवत, तणस, गव्हांडा, कुटार असल्यास झाडाभोवती ५ ते १० सेमी. थर देऊन आच्छादन द्यावे, यामुळे बाष्पीभवन कमी होण्यास मदत होते व जमिनीत ओलावा टिकून राहतो आणि आंबिया बहराची फळगळ कमी होण्यास मदत होते. |
| ORANGE | Orange Phytophthora DiseasesManagement: For management of Phytophthora diseases, scrap out gum oozing portion by sharp knife, wash with potassium permanganate solution (10 gm in one litre water) from the infected tree trunk and apply Mefenoxam M Z - 68 (Metalaxyl M 4% + Mancozeb 64 % wp) paste.Spray Mefenoxam MZ-68 @ 2.50 g/liters or fosetyl Al @ 2.5g/litre |

| Horticulture(Varieties) | Horticulture Specific Advisory |
|---|---|
| | fungicide on the tree covering the whole plant canopy. |
| | संत्राफायटोप्थोरा रोग व्यवस्थापन: संत्रा झाडाच्या खुंटामधून डिंकाचा स्त्राव दिसून आल्यास असा डिंक तीक्ष्ण चाकूने खरडून टाकावा व ती जागा पोटॅशियम परमॅग्नेट १० ग्राम १ लिटर पाणी या प्रमाणात केलेल्या द्रावणाने धुवावे व त्या ठिकाणी मेफेनोक्सम एमझेड ६८ (मेटालाक्झेल एम ४ % + मॅन्कोझेब ६४ % डब्ल्यूपी) या अमलाची पेस्ट लावावी. मेफेनोक्सम एमझेड ६८ @२.५० ग्राम प्रती लिटर पाणी किंवा फोसेटील- एएल @ २.५० ग्राम प्रती लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. |
| ORANGE | Orange Citrus Psylla and Leaf Miner Management: In case of citrus psylla and leaf miner attack, spray dimethoate1.5 ml or imidacloprid 0.5 ml or quinalphos 2 ml or thiamethoxam 0.3 g in one liter water. Repeat spray after 15 days interval. |
| | संत्रा सिला व पाने गुंडाळनारी अळी व्यवस्थापन: संत्रा पिकावर सिट्रस सिला व पाने गुंडाळणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास डायमिथोएट १.५ मिली किंवा इमिडाक्लोप्रीड ०.५ मिली किंवा क्विनालफॉस २ मिली किंवा थायमिथोक्झाम ०.३ ग्राम प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. आवश्यकता भासल्यास १५ दिवसाच्या अंतराने दुसरी फवारणी करावी. |
| MANGO | Mango Jassid Management: Due to continuous cloudy weather, infestation of Jassids on mango trees and spraying of chemical pesticides is required for management, Buprofezin 25 % SC 10 ml or Deltamethrin 2.8 EC 5 ml or Imidacloprid 17.8 % SL 4 ml or Lambda cyhalothrin 5 % EC 5 ml or Methyl demeton 25 EC 10 ml or Dimethoate 30 EC 16.5 ml per 10 liters of water and spraying should be done on stems, branches, tops and inflorescences of mango. |
| | आंबा तुडतुडे कीड व्यवस्थापन: सततच्या ढगाळ हवामानामुळे आंब्याच्या झाडावर तुडतुडे किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास आणि रासायनिक कीटक नाशकाच्या फवारणीची गरज भासल्यास व्यवस्थापनासाठी बुप्रोफेझीन २५ % SC १० मिली किंवा डेल्टामेथ्रीन २.८ % EC ५ मिली किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ % प्रवाही ४ मिली किंवा लँबडा सायहॅलोथ्रिन ५ % प्रवाही ५ मिली मिथाइल डिमेटोन २५ % प्रवाही १० मिली किंवा डायमेथोएट ३० % प्रवाही १६.५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून हे द्रावण खोडावर, फांद्यावर, शेंड्यावर आणि मोहोरावर फवारावे. |
| MANGO | For management of fruit drop in mango spraying should be taken of 20 parts per million (PPM) Naphthalic Acetic Acid (NAA) mix with in water and apply on the inflorescence. |
| | आंबा पिकावरील फळगळ कमी करण्यासाठी २० पीपीएम नॅफथालिक एसिटिक एसिड (एनएए) १० लिटर पाण्यात मिसळून मोहोरावर फवारणी करावी. |
| BRINJAL | If the incidence of aphids, thrips, whitefly and spider mites on brinjal crop, spraying should be taken 2 weeks after planting with Dimethoate 30% EC 10 ml or Quinalphos 25% EC 20 ml or thiometon 25% EC 10 ml per 10 liters of water. For management of top shoot and fruit borer spraying should be taken of cypermethrin 25 % EC 30 ml in 10 litre of water. |
| | वांगी पिकावर मावा, तुडतुडे, पांढरी माशी व कोळी किडीच्या प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी रोप लावणीनंतर २ आठवड्यांनी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मिली किंवा क्विनालफॉस २५ टक्के प्रवाही २० मिली किंवा थायोमेटोन २५ टक्के प्रवाही १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.शेंडे आणि फळे पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी सायपरमेथ्रीन २५ टक्के प्रवाही ३० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

**Live Stock Specific Advisory:**

| Live Stock(Varieties) | Live Stock Specific Advisory |
|---|---|
| COW | Considering the increasing temperature, provide clean and cold water (stored in earthen pot) to the animals. Those who have cultivated berseem, should be done top dressing of 10 kg N/ha after each cutting to encourage quick growth and high yield. Deworming of livestock should be done by seeking advice of Veterinary practitioner. |
| | वाढते तापमान लक्षात घेता जनावरांचे उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी जनावरांना शेड किंवा गोठ्यात ठेवावे. जनावरांना स्वच्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. ज्या शेतकऱ्यांनी बरसीम या चारा पिकाची लागवड केली असेल त्यांनी, प्रत्येक कापणीनंतर योग्य वाढ आणि चाऱ्याच्या जास्त उत्पादनासाठी प्रती हेक्टर १० किलो नत्र उभ्या पिकात द्यावे. पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या |

| Live Stock(Varieties) | Live Stock Specific Advisory |
|---|---|
| | सल्ल्याच्या मदतीने जनावरांना जंत नाशकाची मात्रा/लस द्यावी. |

**Others (Soil / Land Preparation) Specific Advisory:**

| Others (Soil / Land Preparation) (Varieties) | Others (Soil / Land Preparation) Specific Advisory |
|---|---|
| GENERAL ADVICE | Consideringincreasing temperature, availability of soil moisture and crop water need irrigate the leafy vegetables, okra, guar, chawli, cucumber, Bottle Gourd, pumpkin, ridge gourd, bitter gourd, round gourd, watermelon, muskmelon, spinach, radish, fenugreek and coriander. |
| | तापमानात होणारी संभाव्य वाढ लक्षात घेता पालेभाज्या, भेंडी, गवार, चवळी, काकडी, दुधी भोपळा, काशीफळ, दोडका, कारली, ढेमसे, टरबूज, खरबूज, पालक, मुळा, मेथी आणि कोथिंबीर पिकास जमिनीतील ओलावा बघून आवश्यकतेनुसार ओलीत करावे. |
| GENERAL ADVICE | Farmers should take necessary precautionary measures while spraying insecticide, fungicide etc. |
| | शेतकरी बांधवांनी कीटकनाशके, बुरशीनाशके इत्यादींची फवारणी करताना स्वतःची योग्य ती काळजी/खबरदारी घ्यावी. |